## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०
**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- २०/०३/२०१८

### चोरीचे गुन्हयात आतापावेतो सर्वात जलदगतीने निकाल
### मालेगावात चोरीचे गुन्हयातील आरोपीस कारावासाची शिक्षा

---

मालेगाव शहरात कॅम्प पोलीस ठाणे हद्दीत **दिनांक १२ मार्च २०१८** रोजी कलेक्टर पट्टा येथील रहिवासी श्री. साखरचंद दादाजी चव्हाण यांनी आय.सी.आय.सी.बॅकेतुन **७० हजार रूपये** रोख रक्कम काढुन त्यांचे मोटर सायकलचे डिक्कीत ठेवली होती, मोटर सायकल एल.व्ही.एच. महाविद्यालयाचे गेटसमोर पार्क करून ते त्यांचे मुलास सोडण्यासाठी गेले असता, एका अज्ञात चोरटयाने त्यांचे मोटर सायकलचे डिक्कीचे लॉक तोडुन पैसे काढले व तेथुन पलायन करत असतांना तेथील काही इसमांनी व पोलीसांनी त्यास जागेवरच ताब्यात घेतले. सदर बाबत मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेस । गुन्हा रजि. नंबर १०/२०१८ भादवि कलम ३७९,५११ प्रमाणे दिनांक १२/०३/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील निष्पन्न **आरोपी नामे नागराजन  बी. राजेंद प्रसाद, वय ३९, रा. पेडीयार नगर, विलीवक्कम, चेन्नई, राज्य तमिळनाडु** यास तात्काळ अटक करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार **पोलीस उपनिरीक्षक श्री.संतोष तिगोटे** यांनी सदर गुन्हयातील आरोपीविरूध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून आरोपी नागराजन राजेंद्र प्रसाद याचेविरूध्द दिनांक १७/०३/२०१८ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं.२, मालेगाव न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर गुन्हयाचे तपासात मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेचे पोना संतोष सांगळे, पोशि ज्ञानेश्वर पाटोळे, अनिल शेरेकर अशांनी कौशल्यपुर्वक पुरावे गोळा करून तपासात मदत केली. सदर खटल्यात मालेगाव कॅम्प पोलीस ठाणेचे कोर्ट पैरवी अधिकारी पोशि/मुकूंद परदेशी यांनी कामकाज पाहिले.

आज दिनांक २०/०३/२०१८ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं.२, मालेगाव न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपीविरूध्द तपासी अंमलदार यांनी सादर केलेल्या सबळ पुराव्यास अनुसरून आरोपी नामे **नागराजन  बी. राजेंद प्रसाद, वय ३९, रा. पेडीयार नगर, विलीवक्कम, चेन्नई, राज्य तमिळनाडु** यास भादवि कलम ३७९, ५११ अन्वये दोषी ठरवुन **०७ दिवस कारावासाची शिक्षा** ठोठावली आहे.

वरील गुन्हयातील तपासी अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**,व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी अभिनंदन केले असुन तपासी अंमलदार व कोर्ट पैरवी अधिकारी यांना प्रत्येकी ५००० रू. रकमेचे बक्षीस जाहिर केले आहे. चोरीचे गुन्हयात आतापावेतो मा.न्यायालयाने दिलेला हा सर्वात जलदगतीचा निकाल ठरला आहे. सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार यांनी सबळ पुराव्यानिशी मा.न्यायालयात तात्काळ दोषारोप पत्र सादर केले होते.